# SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
**Affiliation No. 1130703**
**Academic session 2024-25**
**NOTES- 10 (TERM-2)**
**Subject - Marathi**

**std.7th**

**Prepared by: Renuka Joshi** **LESSON- १०.बॉल (कविता)**

- **पूर्व उपक्रम – तुम्हाला माहित असलेल्या कोणत्याही पाच खेळांची नावे लिहून एका खेळाची माहिती लिहा.**

**शब्दार्थ.**

१.भ्यालो - घाबरलो 2.संतापलो - रागावला

३. ठोकली - मारली ४. पोर - मुले

५. फाटक - घरासमोरचा छोटे दार. ६.कडकडले - रागाने ओरडणे

**प्रश्न १.पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बॉल सणाणत कोठे गेला?

**उत्तर** - बॉलबंगल्याच्या खिडकीची काच फोडून खाली सणाणत गेला.

२. बंगल्यात एकटेच कोण राहत होते?

**उत्तर** - बंगल्यात एकटेच आजोबा राहत होते.

३. मुलाने आजोबांना काय विचारले?

**उत्तर** - मुलाने आजोबांना "मिशीवाले आजोबा,आमचा बॉल देणार काय?असे विचारले"

४.सगळी पोर काय समजून चुकली?

**उत्तर** - आजोबा संतापले म्हणजे आता आपला बॉल गेला असं सगळी पोर समजून चुकली.

५.बॉल देताना आजोबांनी काय केले?

**उत्तर** - बॉल देताना आजोबांनी हळूच आपले डोळे पुसले.

**प्रश्न २. पुढील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.**

| **'अ' गट** | **उत्तर** | **'ब' गट** |
|---|---|---|
| १. आजोबा | आजी | * नंतर |
| २.हसत | रडत | * गेला |
| ३.हळूच | जोरात | * बरोबर |
| ४. आता | नंतर | * आजी |
| ५. आला | गेला | * रडत |
| ६. चूक | बरोबर | * जोरात |
| ७. देणे | घेणे | * मी |

८. खाली वर * घेणे

९. तू मी * वर

**प्रश्न ३. कोण कोणास म्हणाले ते लिहा.**

१. “मिशीवाले आजोबा,आमचा बॉल देणार काय?”

**उत्तर -** कवी (मुलगा)आजोबांना म्हणाला.

२. “गाढव कुठला! कोण रे तू?”

**उत्तर -** आजोबा मुलाला म्हणाले.

**प्रश्न ४. समानार्थी शब्द लिहा.**

१. संताप = राग २.पोर = मुले

३. भ्यालो = घाबरलो ४. ढग = मेघ

**प्रश्न ५. पुढील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा.**

१. खिडकी बंद कर. **वाक्याचा प्रकार -** आज्ञार्थी वाक्य

२. सचिन तेंडूलकर उत्तम फलंदाज आहे. **वाक्याचा प्रकार -** विधानार्थी वाक्य

३. तू बाहेर केव्हा जाणार आहेस? **वाक्याचा प्रकार -** प्रश्नार्थी वाक्य

४. किती छान आहे हे फूल! **वाक्याचा प्रकार -** उद्गारार्थी वाक्य

५. हे काही सोपे काम नाही. **वाक्याचा प्रकार -** नकारार्थी वाक्य

६. तो सिनेमा पाहतो. **वाक्याचा प्रकार -** विधानार्थी वाक्य

**Subject Teacher** **HOD** **Co-Ordinator** **Principal**